आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
२ ऑक्टोबर २०२५ - गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- देशभरात विजयादशमीचा उत्साह, राज्यातल्या सणावर पूरस्थितीचं सावट
- जनसेवेच्या कार्यात युवकांनी उत्साहाने सहभागी व्हावं असं माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांचं संघाच्या शताब्दी कार्यक्रमात आवाहन
- धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त नागपुरात विविध कार्यक्रम
- बनारस घराण्याचे ख्यातनाम गायक पद्मविभूषण पंडित छन्नूलाल मिश्रा यांचं निधन

**आणि**

- भारत विरुद्ध वेस्ट इंडिज क्रिकेट कसोटी मालिकेतला पहिला सामना अहमदाबादमध्ये सुरू

**<><><><><>**

आश्विन शुद्ध दशमी - विजयादशमी अर्थात दसऱ्याचा सण  आज सर्वत्र पारंपरिक पद्धतीने शस्त्रपूजा करून साजरा होत आहे. नवरात्रौत्सवाचा समारोप करणारा हा सण महाराष्ट्रात शिलंगणाचं सोनं लुटून साजरा केला जातो. साडेतीन मुहूर्तांपैकी एक असल्यामुळे या सणाला नवीन खरेदी केली जाते.  मात्र अनेक ठिकाणी अतिवृष्टी आणि पुराचं सावट सणावर जणवत आहे. पिकांचं आणि फूलपिकांचं नुकसान झाल्यामुळे फुलं तोरणं यांच्या प्रमाणात घट झाली आहे.

विजया दशमीनिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी देशवासियांना शुभेच्छा देताना म्हटलं की, न्याय, समानता आणि सौहार्दाच्या विचारांनी प्रेरित होऊन एकत्र मार्गक्रमण करणारा समाज आणि देश निर्माण करण्यासाठी दसरा हा सण प्रेरित करेल,

असत्यावर सत्याच्या विजयाचं प्रतिक म्हणून विजयादशमीचा सण साजरा केला जातो. यावेळी सर्वांना साहस, बुद्धी आणि भक्तीमार्गावर निरंतर अग्रेसर राहण्याची प्रेरणा मिळावी या शब्दात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दसऱ्याच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

राज्यातल्या पुराच्या संकटसमयी सर्वांनी आपद्ग्रस्त नागरिकांच्या पाठीशी उभं रहावं आणि त्यांना धीर द्यावा, असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दसऱ्याच्या शुभेच्छा देताना केलं आहे.

**<><><><><>**

जनसेवेच्या कार्यात युवकांनी मोठ्या उत्साहानं सहभागी व्हायला हवं. नैतिक मूल्यांवर आधारित राजकारणात सहभाग घेणं हे जनसेवेचं प्रभावी माध्यम असल्याचं प्रतिपादन माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी केलं आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी निमित्त नागपूरात आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. २०४७ पर्यंतच्या विकसित भारतात संघांचं महत्त्वपूर्ण योगदान असेल अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

**होल्ड - रामनाथ कोविंद**

यावेळी त्यांनी देश तसंच संघाच्या कार्यात महत्त्वपूर्ण योगदान दिलेल्या व्यक्तींचं स्मरण केलं. सरसंघचालक मोहन भागवत यांनी यावेळी संघाच्या १०० वर्षांच्या कार्याचा आढावा घेतला. सामाजिक समरसता, कुटुंब प्रबोधन, पर्यावरण संरक्षण, शिस्त आणि संविधानाच पालन या पंचसूत्रीचा अधिकाधिक अवलंब करण्याचं आवाहन त्यांनी केलं. आत्मनिर्भर भारत निर्माण करताना देशाच्या गरजेनुसारच इतर राष्ट्रांवर अवलंबून रहावं, असंही ते यावेळी म्हणाले.

***होल्ड - सरसंघचालक***

पहलगाम हल्ल्याला भारतानं दिलेल्या प्रत्युत्तराचं त्यांनी स्वागत केलं. भाषा, प्रांत आणि जात या मुद्द्यावरुन भेदभाव निर्माण करणाऱ्यांपासून सावध राहण्याचं

आवाहन त्यांनी केलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यासह विविध मान्यवर, स्वयंसेवक या कार्यक्रमाला उपस्थित होते. संघाच्या शतकपूर्तीनिमित्त देशभरात विविध ठिकाणी संचलन आणि इतर कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

**<><><><><>**

समाजाची सेवा आणि राष्ट्रनिर्माणाचं उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून १०० वर्षापूर्वी संघाची स्थापना झाल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हटलं आहे. संघाच्या शताब्दीनिमित्त विविध वृत्तपत्रात त्यांचा लेख प्रसिद्ध झाला आहे. गेल्या १०० वर्षात संघानं लाखो स्वयंसेवकांना घडवलं आणि संघांच्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी ते कार्यरत होते, असं प्रधानमंत्र्यांनी या लेखात नमूद केलं आहे.

**<><><><><>**

६९वा धम्मचक्र प्रवर्तन दिन आज नागपूरमध्ये साजरा होत आहे. या पार्श्वभूमीवर बौद्ध अनुयायी मोठ्या संख्येनं दीक्षाभूमीवर दाखल झाले आहेत. यानिमित्त आज सकाळी विशेष बुद्ध वंदना झाली. यावेळी परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे अध्यक्ष भदंत आर्य नागार्जुन सुरई ससाई यांनी अनुयायांसोबत बुद्ध वंदनेत सहभाग घेतला.

**<><><><><>**

हिंदुस्तानी शास्त्रीय संगीताच्या बनारस घराण्याचे ख्यातनाम गायक पंडित छन्नूलाल मिश्रा यांचं आज पहाटे उत्तरप्रदेशात मिर्झापूर इथं निधन झालं. ते ८९ वर्षांचे होते. खयाल गायकीबरोबरच ठुमरी, भजन, कजरी आणि चैती गायनासाठी ते प्रसिद्ध होते.शास्त्रीय संगीत आणि लोकसंगीताचा मिलाफ त्यांनी आपल्या गायकीतून पेश केला. खेले मसाने में होली ही त्यांची होरी विशेष गाजली. १९३६मधे जन्मलेले छन्नूलाल मिश्रा यांनी सुरुवातीचं शिक्षण त्यांचे आजोबा प्रसिद्ध तबला वादक गुंडई महाराज शांताप्रसाद यांच्याकडून घेतलं. त्यानंतर वडील

बद्रीप्रसाद मिश्रा, आणि किराणा घराण्याचे उस्ताद अब्दुल ग़नी खान आणि ठाकूर जयदेव सिंग यांच्याकडेही ते शिकले. २०१० मधे त्यांना पद्मभूषण तर २०२० मधे पद्मविभूषणने सन्मानित करण्यात आलं होतं. संगीत नाटक अकादमी सह अनेक पुरस्कार त्यांना मिळाले होते. छन्नूलाल मिश्रा यांच्या पार्थिवावर आज संध्याकाळी वाराणसीत मणिकर्णिका घाटावर अंतिम संस्कार होतील. छन्नूलाल मिश्रा यांच्या निधनाबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सीपी राधाकृष्णन, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी तीव्र दुःख प्रकट केलं असून आदरांजली वाहिली आहे.

**<><><><><>**

भारत आणि वेस्ट इंडिज दरम्यानच्या कसोटी क्रिकेट मालिकेतला पहिला सामना आजपासून अहमदाबादमध्ये सुरू झाला. नाणेफेक जिंकून फलंदाजीला आलेल्या वेस्ट इंडिजचे फलंदाज खेळपट्टीवर टिकाव धरू शकले नाहीत. त्यांच्या एकाही फलंदाजाला अर्धशतक ठोकता आलं नाही. मोहम्मद सिराजने चार गडी टिपले. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा वेस्ट इंडिजच्या ८ बाद १५० धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

सेवा पर्व या विशेष मालिकेत आपण सरकारच्या विविध क्षेत्रातील कामगिरीविषयी जाणून घेत असतो. आज आपण जाणून घेणार आहोत सुरक्षा दलांनी राबवलेल्या नक्षलविरोधी मोहिमेबद्दल.....

**होल्ड कॅप्सूल**

*(केंद्र सरकारने नक्षलविरोधी कारवाई अधिक तीव्र करण्याचा निर्णय घेतल्यानंतर गेल्या अकरा वर्षात सुरक्षा दलांनी नक्षलींविरोधात शून्य सहिष्णुता धोरणाचा अवलंब केला आहे. नक्षलग्रस्त जिल्ह्यांमधे सरकारी योजनांची अंमलबजावणी केली जात आहे. जे प्रदेश नक्षलग्रस्त म्हणून ओळखले जात असत ते आता हरित विकासाचे प्रदेश झाल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आपल्या स्वातंत्र्यदिनाच्या भाषणात म्हटलं.....*

***होल्ड बाईट मोदी***

*नक्षलवाद्यांविरोधात कठोर कारवाई आणि विकासाचा अनुशेष भरून काढत सरकार नक्षलवादाविरोधातली लढाई लढत आहे. नक्षलग्रस्त भागात विकास करण्यासाठी अर्थसंकल्पातील तरतूद तीनशे पटीने वाढवण्यात आली आहे. त्यामुळे आधीच्या तुलनेत नक्षली हिंसेचं प्रमाण ५३ टक्क्यानी कमी झालं आहे. पुढल्या वर्षी ३१ मार्चपर्यंत देशातली नक्षलवादी चळवळ पूर्णपणे संपुष्टात आणण्याचं उद्दिष्ट सरकारने ठेवलं आहे.)*

**<><><><><>**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५६व्या जयंतीनिमित्त तसंच देशाचे दुसरे प्रधानमंत्री लालबहादुरशास्त्री यांच्या जंयतीनिमित्त देश त्यांना अभिवादन करीत आहे. देशभरात आणि परदेशातल्या भारतीय दूतावासांमधे त्यानिमित्त विविध कार्यक्रम होत आहेत. नवी दिल्लीत राजघाट इथं महात्मा गांधींच्या समाधीस्थळी सर्वधर्म प्रार्थनेचं आयोजन करण्यात आलं होतं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, लोकसभेचे सभापती ओम बिरला तसंच लोकसभेतले विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनीही राष्ट्रपिता महात्मा गांधींना आदरांजली वाहिली आहे.

महाराष्ट्रात राजभवन इथं राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि देशाचे दुसरे प्रधानमंत्री लाल बहादुर शास्त्री यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन आदरांजली वाहण्यात आली.

**<><><><><>**

इलेक्ट्रॉनिक्स उपकरण उत्पादन योजनेअंतर्गत सरकारकडे १ लाख १५ हजार ३५१ गुंतवणूक अर्ज दाखल झाल्याचं इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं. ते आज नवी दिल्लीत वार्ताहरांशी बोलत होते. या योजने अंतर्गत अर्ज स्वीकारण्याची मुदत काल संपली. यातून ५९ हजार ३५० कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित आहे.

**//<><><><><>//**